# Iccha tithe marg essay in marathi 200 words

'जिथे इच्छा, तिथे मार्ग' ही म्हण आपल्या आयुष्यातील खूप महत्वाची शिकवण देणारी म्हण आहे. याचा अर्थ असा आहे की जर आपल्याला आयुष्यात काहीतरी साध्य करायचे असेल, तर त्या गोष्टीचा मार्ग नक्कीच सापडतो. इच्छा शक्ती म्हणजे काहीतरी साध्य करण्याची तीव्र इच्छा. ही इच्छा आपल्याला ध्येय गाठण्यासाठी प्रेरित करते. मग ते ध्येय चांगले आरोग्य असो, वजन कमी करणे असो किंवा एखादा व्यवसाय सुरु करणे असो. त्यासाठी तीव्र इच्छा लागतेच.

याची बरीच उदाहरणं आहेत. कोण उद्योगपती होतो, कोण डॉक्टर होतो, कोण इंजिनियर होतो, कोण अंतराळवीर होतो तर कोण क्रिकेटपट्टू होतो. हे सर्व जण त्यांच्या डोळ्यापुढे एक ध्येय निश्चित करतात. आणि त्यामागे आपली सर्व शक्ती लावून सध्या करायचा प्रयत्न करतात. तुमची इच्छाच तुमच्या प्रयत्नांना बळ देत असते. आपली इच्छाच ध्येयपर्यंतचे मार्ग मोकळे करते.

आपण आपले लक्ष सतत एका गोष्टी वर राहिल्यास, आपण कोणतीही कठीण गोष्ट साध्य करू शकतो. आयुष्यात अशा अनेक उदाहरणांमध्ये, जे या म्हणीवर खरे उतरतात. ही म्हण आपल्याला कठोर परिश्रम करण्यास आणि ध्येय साध्य करण्यासाठी प्रोत्साहित करते. म्हणूनच, जिथे इच्छा, तिथे मार्ग ही म्हण आपल्याला ध्येय साध्य करण्यासाठी अधिक दृढ बनवते. धैर्य आणि आत्मविश्वासाने, कोणतीही गोष्ट साध्य करता येते. म्हणून, आपल्या इच्छाशक्तीला बळकट करा, कारण त्यातूनच यशाचा मार्ग तयार होतो.